# प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)
# PMAY-G

**योजनेचे स्वरूप- केंद्र पुरस्कृत**

**योजनेबाबतचा थोडक्यात तपशील-**

केंद्र शासनाने इंदिरा आवास योजनेचे रूपांतर प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण मध्ये केले असून राज्यात या योजनेची अंमलबजावणी सन 2016-17 या वित्तीय वर्षापासून करण्याचा निर्णय दि.14.10.2016 च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

केंद्र शासनाने दिनांक 1 एप्रिल, 2016 पासून नविन मंजूर घरकुलांकरिता साधारण क्षेत्र रू.1.20 लक्ष व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्राकरिता रू.1.30 लक्ष इतकी प्रती घरकुल किंमत निश्चित केलेली आहे.

प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत प्रति घरकुल अनुदान साधारण क्षेत्र रू.1,20,000/- व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी रू.1,30,000/- एवढे अनुज्ञेय असेल.

प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत केंद्र व राज्य हिस्सा 60:40 प्रमाणानुसार प्रति घरकुल साधारण क्षेत्राकरिता रू.48,000/- व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्राकरिता रू.52,000 प्रमाणे राज्य हिस्सा अनुज्ञेय राहील.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत लाभार्थ्यांची निवड सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण-2011 च्या माहितीच्या आधारे करण्यात येत आहे.

प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत केंद्र व राज्य हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात PFMS (Public Financial Management System) प्रणालीव्दारे थेट वितरीत करण्याची कार्यपध्दती सुरू करण्यात आली आहे.

# रमाई आवास योजना

**योजनेचे स्वरूप- राज्य पुरस्कृत**

**रमाई आवास योजना ही राज्य पुरस्कृत योजना असून ती ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील बेघर किंवा कच्चे घर असलेल्या लोकांकरीता राबविण्यात येते. सामाजिक आर्थिक जात सर्व्हेक्षण - २०११ यादी बाहेरील व रक्कम रू. १.०० लक्षपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या लाभार्थ्याला स्वत:चे घर बांधण्यासाठी रक्कम रू.१.२० / रु. १.३० लाख अनुदान देण्यात येते. Awaassoft - PFMS प्रणालीचा वापर योजनेच्या अंमलबजावणीमध्ये करण्यात येत आहे. याव्दारे घर बांधण्यासाठीचा निधी सरळरित्या लाभार्थ्यींच्या खात्यामध्ये वर्ग करण्यात येत आहे.**

**रमाई आवास योजनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनामार्फत निर्गमित करण्यात आलेले विविध शासन निर्णय या सोबत जोडण्यात येत आहेत**

# शबरी जमाती घरकुल योजना

**योजनेचे स्वरूप- राज्य पुरस्कृत**

**शबरी जमाती घरकुल योजना ही राज्य पुरस्कृत योजना असून ग्रामीण भागातील अनुसूचित जमातीतील बेघर किंवा कच्चे घर असलेल्या लाभधारकांकरिता राबविण्यात येत आहेत. सामाजिक - आर्थिक जात सर्व्हेक्षण - २०११ यादीबाहेरील व रक्कम रू. १.०० लक्षापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या लाभार्थ्याला स्वत:चे घर बांधण्यासाठी रक्कम रू. १.२०/ रु. १.३० लाख अनुदान देण्यात येते. Awaassoft - PFMS प्रणालीचा वापर योजनेच्या अंमलबजावणीमध्ये करण्यात येत आहे. हयाव्दारे घर बांधण्यासाठीचा निधी सरळरित्या लाभार्थ्यींच्या खात्यामध्ये वर्ग करण्यात येत आहे.**

# पारधी जमाती घरकुल योजना

**योजनेचे स्वरूप- राज्य पुरस्कृत**

**पारधी जमाती घरकुल योजना ही राज्य पुरस्कृत योजना असून ग्रामीण भागातील अनुसूचित जमातीतील बेघर किंवा कच्चे घर असलेल्या लाभधारकांकरिता राबविण्यात येत आहेत. सामाजिक - आर्थिक जात सर्व्हेक्षण - २०११ यादीबाहेरील व रक्कम रू. १.०० लक्षापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या लाभार्थ्याला स्वत:चे घर बांधण्यासाठी रक्कम रू. १.२०/ रु. १.३० लाख अनुदान देण्यात येते. Awaassoft - PFMS प्रणालीचा वापर योजनेच्या अंमलबजावणीमध्ये करण्यात येत आहे. हयाव्दारे घर बांधण्यासाठीचा निधी सरळरित्या लाभार्थ्यींच्या खात्यामध्ये वर्ग करण्यात येत आहे.**